# अनुक्रमणिका


| अ नं. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रास्ताविक | |
| प्रकरण १ | लेखिकेचा परिचय (व्यक्तिमत्व आणि साहित्य) | १ ते १२ |
| प्रकरण २ | सानिया यांच्या 'खिडक्या' कथासंग्रहाचा परिचय व विशेष | १३ ते ६९ |
| प्रकरण ३ | सानिया यांच्या 'दिशा घराच्या' कथासंग्रहाचा परिचय व विशेष | ७० ते १३४ |
| प्रकरण ४ | सानिया यांच्या कथांचे स्वरुप व वाड्.मयीन विशेष | १३५ ते १६७ |
| प्रकरण ५ | उपसंहार | १६८ ते १७३ |
| | परिशिष्ट | १७४ ते १७८ (अ) |
| | संदर्भसूची | १७९ ते १८० |

# प्रास्ताविक व भूमिका

'सानिया' यांच्या कथालेखनाचे विशेष ('खिडक्या' आणि 'दिशा घराच्या') या कथासंग्रहाच्या आधारे हा विषय एम्.फिल. च्या शोध प्रबंधासाठी निवडण्यामागे मराठी विभाग (शिवाजी विद्यापीठ) तसेच मार्गदर्शिका डॉ. सौ. सुलक्षणा दिलीप कुलकर्णी यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करुन निश्चित केला गेला.

कराडला सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज मध्ये शिकत असताना 'प्रतीती' आणि 'खिडक्या' हे दोन कथासंग्रह वाचले होते. त्यावेळी 'खिडक्या' हा कथासंग्रह मला खूप आवडला होता. त्यांच्याविषयी काहीतरी लिहावे असे सारखे वाटायचे आणि ते लिहण्याची संधी मला एम्.फिल. मुळे मिळाली.

'खिडक्या' या कथासंग्रहाबरोबर कुलकर्णी मॅडम यांनी 'दिशा घराच्या' हा कथासंग्रह वाचायला सांगितला. तो मला आवडलादेखील. तो एक दीर्घ कथासंग्रह आहे. त्यातील स्त्री व्यक्तिरेखा मनात कुठेतरी ठसून राहिल्या. म्हणून या दोन्ही कथासंग्रहाची निवड एम्.फिल. च्या प्रबंधिकेसाठी केली.

मी स्वत: एक स्त्री आहे. त्यामुळे मला स्त्रियांविषयी खूप आत्मीयता आणि जिव्हाळा आहे. आजपर्यंतचा माझ्या जीवनाचा प्रवास, माझ्या आयुष्यातील दु:ख, अडचणी या दुसऱ्या स्त्रियांच्या बाबतीत तशाच असतील का? हे जाणून घेण्याची मला खूप उत्सूकता होती. स्त्री ही कितीही शिकली, सवरली तरी तिला दुय्यम स्थान का? असा प्रश्न मला सारखा सतवायचा. परंतू ज्यावेळी सानियांचे हे दोन्ही कथासंग्रह वाचले त्यावेळी आयुष्यात पुन्हा उभे रहायची उमेद मिळते, मनोबल वाढते. मनोभूमिका तयार करणाऱ्या या कथा आहेत. त्यांच्या एक दोन कथांचा अपवाद सोडला तर स्त्रियांच्या शारिरीक अत्याचारापेक्षा जो भावनिक आणि मानसिक कोंडमारा झालेला आहे यांचे दर्शन त्यांच्या कथासंग्रहामध्ये दिसून येते. 'खिडक्या' आणि 'दिशा घराच्या' या दोन्ही कथासंग्रहाच्या लेखनाच्या विशेषांचा अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. ही प्रबंधिका इतर अभ्यासकांना अभ्यास करण्यास पूरक ठरेल याचा मी प्रयत्न केला आहे.

'सानियांचे व्यक्तिमत्व आणि साहित्य' या पहिल्या प्रकरणाचा थोडक्यात आढावा घेतला आहे. 'खिडक्या' या कथासंग्रहाचा परिचय व विशेष तसेच 'दिशा घराच्या' या कथासंग्रहाचा परिचय व विशेष त्याचप्रमाणे 'सानिया यांच्या कथांचे स्वरूप व वाङ्.मयीन विशेष' सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'उपसंहार' या प्रकरणात सर्व प्रकरणांच्या निष्कर्षांचा समावेश केलेला आहे. परिशिष्टामध्ये सानियांचा परिचय, त्यांना मिळालेले पुरस्कार, प्रकाशित पुस्तके, मुलाखत, त्यांनी पाठवलेले पत्र यांचा समावेश केलेला आहे.

सानियांना पाहण्याची, त्यांच्या साहित्यावरुन त्यांचे व्यक्तिमत्व कसे असेल हे पाहण्याची मला तीव्र इच्छा होती. ती इच्छा त्यांची मुलाखत घेतल्यानंतर पूर्ण झाली.

प्रबंधिकेच्या शेवटी संदर्भग्रंथाची सूची दिलेली आहे.

## ऋणनिर्देश

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करीत असताना निवड करण्यापासून ते प्रबंधाला पूर्णत्व देण्यापर्यंत माझ्या आदरणीय व माननीय मार्गदर्शिका डॉ. सौ. सुलक्षणा दिलीप कुलकर्णी, उपप्राचार्या व मराठी विभाग प्रमुख, मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव यांनी केलेल्या मौलिक मार्गदर्शनामुळे, स्वत: घेतलेल्या कष्टामुळे, सहकार्यामुळे, व वेळोवेळी प्रबंध पूर्ण करण्यासाठी दिलेल्या प्रेरणेमुळे हा प्रबंध पूर्ण होऊ शकला. त्यांची सदैव ऋणी राहणे हे मी माझे सद्‌भाग्यच समजते.

शोधनिबंधाचा अभ्यास करताना माझी प्रिय मैत्रीण शुभांगी मुळीक, सुकेशिनी पाटील यांनी वेळोवेळी मदत केली. त्याबद्दल त्यांची मी अत्यंत आभारी आहे.

एम्.फिल. अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन तो पूर्ण करण्यासाठी सहकार्य व प्रेरणा देणारे आदरणीय प्राचार्य राजमाने (सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड), प्राचार्य कणसे डी.जी.( मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव), डॉ. सुमन पाटील, मराठी विभागप्रमुख, प्रा. संभाजीराव देसाई (सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड), डॉ. सौ. दिवेकर मॅडम, प्रा. पट्टेकरी सर, इस्लामपूर, डॉ. पाटील सर, कुंदप सर, प्रा. सौ. सूर्यमाला जाधव, प्रा. खुळपे सर, कराड या सर्वांचे ऋण कधीही न फिटण्यासारखे आहे.

तसेच प्रा. सौ. रैनाक मॅडम, प्रा. सौ. निकम मॅडम यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाल्याबद्दल मी त्यांची सदैव ऋणी आहे.

माझे वडील श्री. नंदकुमार गणपती मिरजकर, आई सौ. सुमन नंदकुमार मिरजकर, तसेच माझे भाऊ चि. प्रदीप व चि. संदीप नंदकुमार मिरजकर, माझे पती श्री. हिरालाल व दीर चि. नामदेव माणिक पतंगे, त्याचप्रमाणे माझ्या सासूबाई जयश्री व प्रेमला माणिक पतंगे या दोन्ही कुटूंबातील सर्वच सदस्यांनी मला सतत प्रेरणा दिली.

एम्.फिल. चा अभ्यास पूर्ण करण्यासाठी आर्थिक मदत करणारे श्री. उमेश पांडुरंग नाझरे(मावस भाऊ)व चि. सुनिल पवार (मित्र) या सगळयांची मी सदैव ऋणी आहे.

शोध निबंधासाठी आवश्यक महत्वाची अशी संदर्भ पुस्तके मिळवून देण्यासाठी अनेकांनी सहकार्य केले. सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराडचे ग्रंथालय, मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगावचे ग्रंथालय, पुणे मराठी ग्रंथालय, महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे ग्रंथालय इत्यादी ठिकाणी उपलब्ध असलेल्या संदर्भ पुस्तकांचे मला अमोल सहकार्य लाभले. त्या सर्व ग्रंथपालांच्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञ आहे. प्रस्तुत प्रबंधाची संगणकाद्वारे अक्षरजुळणी करणारे ब्राईट कॉम्प्युटर्स, कडेगावचे चालक श्री. आशपाक बागवान यांचीही मी आभारी आहे.

यापुढे या सर्वांचे सहकार्य मिळावे ही आशा बाळगते व सर्वांची ऋणी राहू इच्छिते.

(दिपाली मिरजकर)